Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
Vol - V Issue-XII DECEMBER 2018 ISSN 2349-638x Impact Factor 4.574

# बारोमासः नवीन आर्थिक धोरणाचं कटुसत्य

**प्रा.डॉ. शिवराज काचे**
दयानंद कला महाविद्यालय, लातूर

१९९१ साली भारताने नवीन आर्थिक धोरण स्वीकारले या सोबतच जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण या त्रिमितीचा स्वीकार केला. देशाच्या सर्वांगीण विकासासाठी आखण्यात आलेल्या या धोरणामुळे शहराचा काही प्रमाणात विकास झाला. पण सर्वाधिक फटका ग्रामीण समूह आणि शेतकरी घटकाला बसला आहे. खुल्या आर्थिक धोरणामुळे स्पर्धेच्या बाजारपेठेत टिकून राहण्यासाठी शेतकऱ्यांनी आधुनिक शेतीचा स्वीकार केला. यातून वाढलेला शेतीचा खर्च उत्पन्नातून मिळणारा नफा याचा ताळमेळ लागणे अशक्यच झाले. निसर्गाच्या असमतोलामुळे शेतकऱ्याच्या डोळ्यात पाणी तरळू लागले. कृषि मालाला मिळणारा अल्प बाजार भाव, व्यापाऱ्याकडून होणारी लूट, शासनाचे आयात-निर्यात धोरण, शासनाचे वेळ काढू धोरण यातून भारतीय शेती संपूर्ण उजाड झलेली आहे.

सदानंद देशमुख यांची 'बारोमास' ही कादंबरी २००२ साली प्रकाशित झाली असून या कादंबरीच्या माध्यमातून आजच्या शेती युगाशी निगडित असलेल्या शेतकऱ्यांची आणि खुद्द शेतीची शोकांतिका आहे. शेतकऱ्याच्या जीवनाचे सोनं करणारी शेती, सरकारचे धोरण तसेच जागतिक व्यापार, गॅट करारामुळे भारतीय शेती आणि शेतकरी पुरेपूर कंगाल आणि स्पर्धेच्या मुक्त बाजारपेठेत कायमचा दिवाळखोर झालेला आहे, हे कटुसत्य या कादंबरीतून दिसून येते.

भारत हा कृषिप्रधान देश आहे. भारताची अर्थव्यवस्था कृषी उत्पन्नावर अवलंबून आहे. परंतु सध्या शेतीची आणि शेतकऱ्यांची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. शेतीतून उत्पादित होणाऱ्या शेतीमालाचे बाजारात होणारे अवमूल्यन यामुळे शेतकरी पुरता कंगाल बनत चालला आहे. इतर कंपन्याप्रमाणे भावनिश्चितीचे स्वातंत्र्य शेतकऱ्यांना मिळत नसल्याने त्यांच्या उत्पन्नात वाढ होण्याऐवजी घटच होताना दिसून येते. असे चित्र 'बारोमास' या कादंबरीतून दिसून येते. शेतकरी संघटनेतील नेते तेजराव खपके शेतीमालाच्या भाव निश्चिती विषयी एकनाथला म्हणतात की, "माल चांगला झाला त भाव नसते, अन् भाव असते तवा माल व्हत नाई. पिकवायचं आपल्या हाती हाये, पण भावाचं नाई. इषेश आसं की बाकी सम्धा वस्तु घ्यायच्या न घेणाराले देणाऱ्याच्या दारात जावं लागते". देशाची अर्थव्यवस्था या शेती व्यवसायावर अवलंबून आहे. पण शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या मालाची किंमत घेणारा व्यापारी ठरवत असतो. यामुळे शेतीमाल उत्पन्नासाठी लागणारा खर्च आणि त्यातून मिळणारा नफा याचा ताळमेळ शेतकरी नाहीतर दलाल, व्यापारी ठरवतात. भांडवलदाराच्या उद्योग व्यवसायातील वस्तुची किंमत ठरवण्याचा अधिकार शेतकऱ्यांना मिळत नाही. "शेतीजन्य उत्पादनाच्या किंमती तो माल विकत घेणारे ठरवतात. विक्रेता ठरवितानाही शेती हंगाम अशा प्रकारच्या वस्तुचे आकंठ उत्पादन असते. त्या काळात किंमती जाणून बुजून खाली आणल्या जातात. विकत घेणारे हे घडवून आणतात. शेतकरी जेव्हा या काळात खुल्या स्पर्धेत उतरलेले असतात. तेव्हा असे घडते. हे औद्योगिक उतपादनाच्या बाबतीत घडत नाही. कारण त्यांना एकाधिकार पध्दतीचे संरक्षण असते. जसे ट्रेड मार्क, पेटेन्टस्, ब्रॅन्डस, जॉईंट स्टॉक कंपनीत त्यांच्या सारख्या संस्थावर आर्थिक बोजा मर्यादित असतो." प्रकारामुळे हे उद्योगपती अमाप नफा मिळवतात. शेती ही एक बहुराष्ट्रीय कंपनी आहे. आपल्या देशातील ७० टक्के जनता शेतीवर अवलंबून असून देशातील जवळ जवळ ५० टक्के उद्योग हे शेतीशी निगडित व्यवसायावर अवलंबून आहेत. असे असून सुध्दा शेतकऱ्यांकडे एकाधिकार पध्दती नसल्याने शेतकरी पूर्ण कंगाल होत आहे. मुक्त बाजारपेठेत हा दुजाभाव कशासाठी असा प्रश्न पडतो.

भारतात दर पाच वर्षाला निवडणुकीचे रणकंदन होते. प्रत्येक राजकीय पक्ष निवडणुका जिंकणाच्या उद्देशाने जनतेला प्रभावित करणारे जाहिरनामे प्रसिध्द करतात. त्यात शेतीमालाच्या भाव वाढीचा आवर्जून उल्लेख केला जातो. निवडणूकीच्यानंतर एकहाती सत्ता स्थापन झाल्यास जाहिरनाम्याचे पहिले पाढे तीन असेच होते. केंद्रात आणि राज्यात बहुमताने निर्माण झालेले स्थिर सरकारातील राजकीय नेते. शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेताना दिसून येत नाही. उलट बहुमताच्या जोरावर स्वतःच्या तुंबड्या भरताना दिसून येतात. असे चित्र 'बारोमास' कादंबरीतून दिसून येते. शेतकरी संघटनेत कार्यरत असलेले शेतकरी तेजराव खपके स्थिर सरकारच्या मनमानी कारभाराविषयी एकनाथाला सांगतात की, "सरकारची बी मले एक गंमतच वाटते. या देशाले स्थिर सरकार नवतं तव्हा शेतकऱ्याच्या तुरीचा भाव एकवीसशे रूपये क्विंटल होता. सोयाबीनचा चौदाशे रूपये व्हता. अन् स्थिर सरकार आलं त तुरीचा भाव चौदाशे झाला अन् सोयाबीनचा सातशे झाला कावून की स्थिर सरकार आल्याबरोबर त्या सरकारनं लोकं

बोंबलतात, महागाई वाढली म्हणून, आयात करायचा झपका सुरु केला. आयात केला की, फायदा होतो न नेते लोकायचा." देशातील बहुमतावर स्थिर झालेले सरकार कायद्याची पायमल्ली करून स्वहीत साधण्यासाठी प्रयत्नशील असतात.

स्वातंत्र्याच्या काळापासून शेतीमालाच्या भाव वाढीचं भिजत पडलेलं घोगडं अद्याप कोणत्याही सरकारला तोडगा काढता आला नाही, उलट गरज नसताना शेतीमालाची आयात करून स्वतःचा फायदाचा केला. "स्वातंत्र्य मिळाल्यापासून आजपर्यंत आपल्या शेतमालाला योग्य भाव देता आला नाही. १९६५ साली कृषिमूल्य आयोग स्थापला. त्यांनी आजतागायत उत्पादन खर्चाची दखल घेऊन योग्य भाव ठरवला असं एकदाही घडलेलं नाही. अन्न महामंडळामुळे शेतकरी वा ग्राहक कुणाचं हित जोपासले जात नाही. याबद्दल कुठलाही राजकीय पक्ष धडधडून काही बोलत नाही. शेतकरी व गरीबाविषयी यच्चयावत नेत्याची संवेदनशीलता यातून स्वच्छ दिसते. ज्यांच्यावर भरवसा ठेवावा तेच दगा देतात. हा अनुभव असल्याने ग्रामीण माणूस सतत संशयी असतो. असं निदान शकतापूर्वी गांधीजींनी केलं होतं. आजही ते तितकचं खरं आहे. सगळे मिळून 'शेतकऱ्यांना जा पुढच्या घरी' असं खेळवतात. राज्य-केंद्राकडे, केंद्र विद्यापीठाकडे बोटे दाखवतात." देशातील राजकीय नेते हे पहिल्यांदा शेतकरी पुत्र आहेत. पण राजकारणात गेल्यानंतर सत्ता हस्तगत करणे आणि सत्ता हाती आली की हायफाय जगणे जगतो आहे. तोच शेतकरी पुत्र पुन्हा शेतकऱ्यांच्या दयनीय अवस्थेकडे पाहण्यास टाळाटाळ करतो आहे. स्वतःवरील जबाबदारी झिडकारून टाकतो. आणि स्वतःच्या फायद्यासाठी शेतीमालाचे भाव पाडले जातात. हे आपल्या देशाचं कटुसत्य आहे.

भारतात १९९५ साली जागतिक व्यापार संघटनेची स्थापना झाली. जागतिक बाजारपेठेचे सर्व परवाने खुले करण्यात आले. यातून शेतकऱ्यांना चांगले दिवस येतील असा अंदाज मांडला जावू लागला. पण स्थानिक पातळीवरील राजकीय नेत्यांनी कृषि मालाच्या आयात-निर्यातीवर आपले उखळ पांढरे करून घेऊ लागले. असे चित्र या कादंबरीतून दिसून येते. शेतकरी संघटनेचे नेते आणि शेतकरी तेजराव खपके समाधान चांदणेला सांगतात की, "आता मुक्त अर्थव्यवस्था आली. तिले आपला इरोध नाई. आपून कोण इरोध करणारे झिंजोल्डे? उलट ज्ञानेश्वर म्हणत तसं ईपूवची माझे घर... होऊ द्या नं पण माणसाने मानसाला खायची नियत नाई ठेवू पण ही आयात म्हणजे आपल्या शेतकऱ्यांची मयत जवळ आल्याची लक्षणे हायेत. जे नाई त्याची आयात करावं. पण जे आधीच महामूर हाये त्याची आयात कशाले? शेतकऱ्याले मातीत घालायले?" मुक्त बाजारपेठेतून होणारी आयात ही शेतकऱ्यांसाठी मयत आहे. शासनाने कृषि मालाची आयात केल्यानंतर देशातील शेतकऱ्यांच्या मालाचे भाव पडले जातात. पण याची चिंता कोणाला आहे. राजकीय नेते स्वतःच्या फायद्यासाठी आयात-निर्यात करतात. हे सांगताना तेजराव तात्या म्हणतात की, "चित्र पालटायचं काम असून ज्या द्यायचे निवडून देतो, ते सरकार करत असते. पण आपल्या सरकारचं आसं धोरण हाये की शेतकरी सुखी नाही झाला पाहजे समजा माल कमी झाला अन् दोन पैसे भाव शेतकऱ्याले जास्त मिळाला की लोकं बोंबलतात जीवनावश्यक वस्तुचे भाव वाढले. मंग कणवाळू सरकार आयात करते. पुढारी लोक मंग घोटाळे करतात. आपलं साधून घेतात. पण माल जास्त झाल्यावर मंग त्याची निर्यात नाय करत. मंग सस्त्या भावात ईकून शेतकऱ्याले आपली ठोकून घ्यावी लागते." नवीन आर्थिक धोरण शेतकऱ्याच्या हिताचे आहे. पण सत्ताधारी राजकीय पुढाऱ्यांनी त्याचा गैरवापर करून शेतकऱ्यांच्या तोंडाचा घास हिसकावून घेतला आहे.

नवीन आर्थिक धोरणाला आज सत्तावीस वर्ष झाली आहेत. पण शेतकऱ्यांचे प्रश्न काही सुटलेले नाहीत. जागतिक व्यापार संघटनेने जगाची मोठी बाजारपेठ बनवली आहे. पण वैयक्तिकरित्या कोणताच शेतकरी या बाजारपेठेत सहभागी होऊ शकत नाही. त्याला शासनाचा आधार आवश्यक असतो. देशातील अन्नधान्याची होणारी वाढ आणि तुटवडा लक्षात घेऊन आयात-निर्यात करण्याची आवश्यकता असते. पण चित्र उलट दिसून येते. दुष्काळ पडला की, धान्य आयात करायचे उत्तम पीक हाती आल्यावर निर्यात रोखून भाव पाडायचे हे नवीन आर्थिक धोरणाचे कटुसत्य आपल्या देशात दिसून येते.

**निष्कर्ष**

१) शासनाच्या आयात-निर्यात धोरणातील दुटपीपणामुळे शेतकरी कंगाल झाल्याचे दिसून येते.
२) जागतिकीकरणात भांडवलदारांना वस्तूच्या किंमती ठरवण्याचा अधिकार आहे. पण शेतकऱ्यांनी अशी एकाधिकारशाही नाही.
३) केंद्रात आणि राज्यात बहुमतान स्थिर झालेले स्थिर सरकारातील राजकीय नेते शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेताना दिसून येत नाही.
४) जागतिक बाजारपेठेत सहभागी होण्यास शेतकऱ्याला मर्यादा येतात.
५) मुक्त बाजारपेठ ही शेतकऱ्यांसाठी एक आभास आहे असे दिसून येते.

**संदर्भ**

१) 'बारोमास' सदानंद देशमुख, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजया नगर, पुणे-४११०३०, तृतीय आवृत्ती, २००७.

२) 'उदारीकरण: नवे आर्थिक धोरण', डॉ. ना.य. डोळे, विद्या प्रकाशन, रूईकर रोड, नागपूर- ४४०००२, प्रथम आवृत्ती, १९९७

३) 'शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या...थांबवायच्या कशा', दिवाकर बोकरे, डायमंड पब्लिकेशन्स, १६९१, सदाशीव पेठ, शंकर प्रसाद, तिसरा मजला, टिळक रोड, पुणे, ४११०३०, प्रथम आवृत्ती, २००८

४) 'विश्वाचे आर्त', अतुल देऊळगावकर, लोकवाङ्मय गृह, भुपेश गुप्ता भवन, ८५ सयाणी रोड, प्रभादेवी, मुंबई-४०००२५, प्रथम आवृत्ती, २०१२